N.C.R.B (एन.सी.आर.बी)
I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म - १)

# FIRST INFORMATION REPORT

**(Under Section 154 Cr.P.C.)**
प्रथम खबर अहवाल
(कलम १५४ फौजदारी प्रक्रिया संहिता)

1. **District (जिल्हा):** औरंगाबाद शहर    **P.S.(ठाणे):** ओसमानपुरा

**FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0202    **Year (वर्ष):** 2023

**Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):** 27/10/2023 23:58

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |

3. (a) **Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**

1. **Day(दिवस):** शुक्रवार    **Date From (दिनांक पासून):** 27/10/2023
   **Time Period (कालावधी):** पहर 6    **Date To ( दिनांक पर्यंत):** 27/10/2023
   **Time From (वेळेपासून):** 16:20 बजे
   **Time To (वेळेपर्यंत):** 16:20 बजे

(b) **Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**
**Date (दिनांक ):** 27/10/2023    **Time (वेळ):** 23:58 बजे

(c) **General Diary Reference (रोजनामचा संदर्भ ):**
**Entry No. (नोंद क्र.):** 025
**Date & Time (दिनांक आणि वेळ):** 27/10/2023 23:58 बजे

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी
5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**

1.(a) **Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):**
पूर्व, 1 किमी    **Beat No. (बिट क्र.):**

(b) **Address (पत्ता):** छ संभाजीनगर

(c) **In case, outside the limit of this Police Station, then** (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):
**Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):**
**District(State) (जिल्हा(राज्य)):**

6. **Complainant / Informant** (तक्रारदार/माहिती देणारा):

(a) **Name** (नाव): तौसिफ कय्युम शेख
(b) **Father's/Husband's Name**(वडील / पती चे नाव) :
(c) **Date/Year of Birth** (जन्म तारीख/वर्ष): 1998
(d) **Nationality** (राष्ट्रीयत्व): भारत
(e) **UID No.** (यु.आय.डी. क्र.):
(f) **Passport No.**(पारपत्र क्र.):
**Date of Issue** (दिल्याची तारीख):
**Place of Issue** (दिल्याचे ठिकाण):
(g) **ID details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License, PAN)** ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )

| **S.No.** (अ.क्र.) | **ID Type** (ओळखपत्राचा प्रकार) | **ID Number** (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

(h) **Address** (पत्ता):

| **S.No.** (अ.क्र.) | **Address Type** (पत्याचा प्रकार) | **Address** (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | जालणा,जालना,महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पता | द्वारकानगर नविन मोंढा, जालणा,जालना,महाराष्ट्र,भारत |

(i) **Occupation** (व्यवसाय):
(j) **Phone number** (फोन नं.):
**Mobile** (मोबाइल नं.): 91-9373395788

7. **Details of known/suspected/unknown accused with full particulars** (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):

| **S.No.** (अ.क्र.) | **Name** (नाव) | **Alias** (उर्फनाव) | **Relative's Name** (नातेवाईकाचे नाव) | **Present Address** (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | लोकसेवक महेश भालचंद्र चौधरी | | | 1. C/O श्री संतोष सोनी प्लट नं 2,शांतीनाथ हाऊस सोसायटी, गादीया ,छत्रपती संभाजीनगर , ओस्मानपुरा ,औरंगाबाद शहर, महाराष्ट्र,भारत |

8. **Reasons for delay in reporting by the complainant/informant** (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):

9. **Particulars of properties of interest** (संबंधीत मालमत्तेचा तपशील):

| **S.No.** (अ.क्र.) | **Property Category** (मालमत्ता वर्ग) | **Property Type** (मालमत्ता प्रकार) | **Description** (वर्णन) | **Value(In Rs/-)** (मुल्य (रू. |
|---|---|---|---|---|
| 1 | नाणे आणि चलन | भारतीय- रुपया | 500 रु दराच्या 08 नोटा. | 4,000.00 |

10 **Total value of property (In Rs/-)**
(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):

4,000.00

11.**Inquest Report / U.D. case No., if any**
(इनक्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):

**S.No.** (अ.क्र.) **UIDB Number** (यु.आय.डी.बी.क्र.)

12.**First Information contents** (प्रथम खबर हकीकत ):

फिर्याद दिनांक 27/10/2023

मी तौसिफ शेख कय्युम,वय-25 वर्षे व्यवसाय-खाजगी नोकरी रा. द्वारकानगर नविन मोंढा, जालना
मो.नं .9373395788
समक्ष पोलीस ठाणे स्टेशन उस्मानपुरा, छत्रपती संभाजीनगर येथे हजर राहुन फिर्याद देतो की ,मी दिनांक 27/10/2023 राजी दोन शासकीय पंचासमक्ष लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,छत्रपती संभाजीनगर, येथे लाच मागणीची तक्रार दिली होती ती खालील प्रमाणे

समक्ष लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,छत्रपती संभाजीनगर, येथे हजर येवुन तक्रार देतो की, मी वरील ठिकाणी राहात असुन, मी जानेवारी-2017 पासुन श्री. बाबासाहेब नारायण उजाड, यांचे मालकीचे ओम इंटरप्रायजेस, गीता काम्प्लेक्स भोकरदन नाका,गादीया हॉस्पिटल समोर, जि.जालना येथे संगणक देखभाल व दुरुस्तीचे काम करतो. तसेच आमच्या दुकाना मार्फत शासकीय व निम शासकीय कार्यालयात संगणक दुरुस्ती व देखभालीचे काम करत असतो. सदर दुकानाचे मालक श्री. बाबासाहेब नारायण उजाड, यांनी सांगितल्याप्रमाणे मी जिल्हा अधीक्षक, कृषी अधिकारी कार्यालय, छत्रपती संभाजीनगर येथे संगणक, अँटी व्हायरस, सी.पी.यु. दुरुस्ती, प्रिन्टर दुरुस्ती इत्यादी कामे केली होती. सदर कामाचे 1) Invoice No. OE/SL/22-23/325 Invoice Date 23/02/2023 चे एकुण बील रक्कम 58656/- रुपये 2) Invoice No. OE/SL/22-23/310 Invoice Date 24/02/2023 चे एकुण बील रक्कम 6500/-रुपये असे दोन्ही बील मिळुन एकुण 65156/- रुपये मंजुर होणेबाबत जिल्हा अधीक्षक, कृषी अधिकारी कार्यालय, छत्रपती संभाजीनगर येथे दिनांक 27/02/2023 रोजी बील सादर केले होते.
त्यानंतर आमचे मालक श्री. बाबासाहेब उजाड यांनी मला सांगितले की, आपले कामाचे बील दाखल करुन 8 महिन्याचा कालावधी झाला आहे. अजुन आपले 65156/- रुपयाचे बील जिल्हा अधीक्षक, कृषी अधिकारी कार्यालय, छत्रपती संभाजीनगर येथुन मंजुरीसाठी बाकी आहे. म्हणुन त्यांनी मला सदर बील मंजुर झाले अगर कसे याबाबत विचारपुस करण्यासाठी दिनांक 26/10/2023 रोजी जिल्हा अधीक्षक, कृषी अधिकारी कार्यालय, छत्रपती संभाजीनगर येथे पाठवले. तेव्हा मी छत्रपती संभाजीनगर येथे येवुन जिल्हा अधीक्षक, कृषी अधिकारी कार्यालयात आल्यानंतर आमचे ओम इंटरप्रायजेसचे बिलाबाबत विचारपुस केली असता सदरील बील अकाऊंट ऑफीसार श्री. चौधरी यांचेकडे असल्याचे समजल्याने मी श्री.चौधरी यांची भेट घेवुन त्यांना माझा परिचय देवुन ओम इंटरप्रायजेस, भोकरदन येथील बिलाबाबत विचारले असता ते मला म्हणाले की, तुमचे बील मंजुर करुन ट्रेझरी येथे दाखल करायचे असेल तर तुम्हाला बील मंजुर करुन ट्रेझरी येथे दाखल करण्यासाठी 4,000/-रुपये द्यावे लागतील. असे म्हणाले. त्यानंतर मी श्री.चौधरी यांना आमचे मालकांना निरोप देतो व तुम्हाला उद्या येवुन भेटतो असे म्हणलो असता श्री चौधरी म्हणले की, तुझ्या मालकाला पाठवु नको उद्या तुच 4,000/- रुपये घेऊन माझ्याकडे ये त्यानंतर मी तुमचे बील ट्रेझरीला पाठवुन देतो तेव्हा मी तेथुन निघुन आलो.
त्यानंतर मी जिल्हा अधीक्षक, कृषी अधिकारी कार्यालयातील अकाऊंट ऑफीसर श्री.चौधरी यांनी बिल मंजुर करुन ट्रेझरी येथे दाखल करण्यासाठी मागितलेल्या 4,000/-रुपये बाबत मालक श्री. बाबासाहेब उजाड यांना सांगितले. तेव्हा आमचे लक्षात आले की, श्री. चौधरी मागत असलेले पैसे हे लाच म्हणुन मागत आहे. व श्री. बाबासाहेब उजाड यांना लाच देण्याची इच्छा नसल्याने त्यांनी श्री. महेश चौधरी यांचे विरुध्द लाचलुचपत प्रतिबंधक विभागामार्फत कारवाई करण्याचा निर्णय घेतला. त्यानंतर जिल्हा अधीक्षक, कृषी अधिकारी कार्यालयातील अकाऊंट ऑफीसर श्री. चौधरी यांनी मला पैसे मागितले असल्याने माझे मालक श्री.बाबासाहेब उजाड यांनी मला श्री.महेश चौधरी, यांचे विरुध्द लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, छत्रपती संभाजीनगर येथे तक्रार देण्याचे सांगितलेवरुन मी व माझे मालक असे दोघेही लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, छत्रपती संभाजीनगर येथे मालक श्री उजाड यांच्या सांगण्यावरुन श्री.

चौधरी यांचे विरुध्द मी तक्रार देण्याकरीता आलो आहे.
माझा व माझे मालक श्री. बाबासाहेब उजाड यांचा जिल्हा अधीक्षक, कृषी अधिकारी कार्यालयाचे अकाऊंट ऑफीसर श्री. चौधरी यांचेशी आर्थिक देण्या-घेण्याचा व्यवहार नाही अगर वैरदुष्मणी तसेच भांडण तंटा नाही.
आज दिनांक 27/10/2023 रोजी मी काम करत असलेल्या ओम इंटरप्रायजेस, जालना या नावाचे बील मंजुर करुन ट्रेझरी येथे दाखल करण्यासाठी जिल्हा अधीक्षक, कृषी अधिकारी कार्यालयाचे अकाऊंट ऑफीसर श्री.चौधरी यांची भेट घेणार आहे. तेव्हा त्यांनी मला लाचेची मागणी करुन लाचेची रक्कम स्वत:अगर इतरामार्फत स्विकारल्यास त्यांना पकडुन त्यांचेवर कायदेशीर कायदेशीर कार्यवाही करावी.वगैरे मजकुराची तक्रार दिली होती.
त्यानंतर पोलीस उप अधिक्षक श्रीमती संगीता पाटील यांनी मी दिलेल्या तक्रार उपस्थित असलेले त्यांच्या सोबतचे दोन शासकीय पंचास वाचण्यास दिली पंचानी ती तक्रार वाचल्या नंतर त्यावर पंचानी सहया केल्या व पोलीस उप अधिक्षक संगीता पाटील यांनी समक्ष म्हणुन सही केली.
त्यानंतर पोलीस उप अधिक्षक श्रीमती संगीता पाटील यांनी मी दिलेल्या लाच मागणीचे तक्रारीचे अनुषंगाने प्रथम लाचमागणी पडताळणी करण्याचा निर्णय माझे व पंचांचे संमतीने घेतला. त्याप्रमाणे लाचमागणी पडताळणी संदर्भात पोलीस उप अधिक्षक संगीता पाटील यांनी मला व पंचास तसेच पथकातील सदस्यांना आवश्यक सुचना दिल्या.
त्यानंतर आमचे ओम इंटरप्रायजेसचे बिल मंजुरी संदर्भात श्री. चौधरी यांची भेट घेऊन पंचासमक्ष लाचेची पडताळणी करण्याकरीता माझ्या कडे सोनी कंपनीचे व्हॉईस रेकॉर्डर देऊन मला व माझ्या सोबत पंच श्री.वानखेडे यांना सुरक्षीत ठिकाणावरुन जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी, छत्रपती संभाजीनगर यांचे कार्यालयात श्री चौधरी अंकाऊट ऑफीसर यांची भेट घेण्यासाठी पायी पायी रवाना केले. आम्ही श्री चौधरी यांच्या कार्यालयात गेल्यानंतर त्याठिकाणी श्री. चौधरी व माझी भेट झाली व आमच्यामध्ये माझे प्रलंबीत कामा बाबत चर्चा झाली सदर वेही मी म्हणालो की, ठिक है, कितना बोलने का.(मालक श्री उजाड यांना सांगण्याकरीता) त्यावर श्री चौधरी म्हणले की, चार पैसे त्यावर मी म्हणलो की, चार का, चार हजार त्यावर चौधरी म्हणाले की, ठिक हे, एक काम कर अभि , ज्यो उधर दिया ना उसको, इसमे भर दे, असे म्हणुन होकार दिला व ओम इंटरप्रायजेस, जालना या नावाचे बील मंजुर करुन ट्रेझरी येथे दाखल करण्यासाठी 4000/- रुपये लाचेची मागणी करुन स्विकारण्याचे मान्य केले व लाचेची रक्कम लगेचच कार्यालयात घेऊन येण्याचे सांगीतले. त्यानंतर मी व पंच श्री.अक्षय वानखेडे असे सापळा पथक थांबलेल्या ठिकणी परत आलो.
त्यानंतर पोलीस उप अधिक्षक श्रीमती संगीता पाटील मॅडम यांनी सदर व्हॉईस रेकॉर्डर मधील संभाषण ऐकले असता सदर संभाषणामध्ये श्री. चौधरी, अंकाऊट ऑफीसर यांनी माझ्याकडे केलेल्या लाचमागणी बाबत त्यांची खात्री झाली.
त्यानंतर श्रीमती पाटील मॅडम यांनी मला लाच देण्याकरीता आवश्यक असलेल्या रक्कमे बाबत विचारणा केली असता मी माझे मालक श्री बाबासाहेब उजाड यांच्याकडुन 500/- रुपये दराच्या 08 भारतीय चलनी नोटा उपलब्ध करुन पोलीस उप अधिक्षक श्रीमती पाटील मॅडमकडे यांच्या ताब्यात दिल्या सदर नोटा असलेली लाचेची रक्कम श्री चौधरी यांना त्यांनी मागणी केल्या प्रमाणे पंचा समक्ष देऊन सापळा कारवाई करण्याचा निर्णय पोलीस उप अधिक्षक श्रीमती पाटील मॅडम यांनी माझे व पंचाचे संमतीने घेतला.
त्यानंतर पोउपअधी श्रीमती संगीता पाटील यांनी मला, सापळा पथक व पंचाना सापळा कारवाई बाबत थोडक्यात सुचना दिल्या व सापळा कारवाईमध्ये नोटांना लावण्यात येणाऱ्या ऍन्थ्रासीन पावडरचे गुणधर्म मला व पंचाना समजावुन सांगीतले व त्याचे प्रात्यक्षीक करुन दाखविले.त्यानंतर पोउपअधी पाटील मॅडम यांच्या सुचने वरुन सदर नोटांना ऍथ्रासिन पावडर लाऊन नोटा माझ्या पँटचे उजव्या बाजुच्या पाठीमागील खिशात ठेवल्या व व्हॉइस रेकॉर्डर मध्ये नवीन मेमरी कार्ड टाकुन सदर व्हॉईस रेकॉर्डर सुरु करुन माझ्याकडे दिले. तसेच श्री चौधरी, अकाऊट ऑफीसर यांनी लाचेची रक्कम स्विकारल्या नंतर पुर्व नियोजित ईशारा करण्याच्या सुचना दिल्या.
त्यानंतर मी व पंच क्रमांक 1 श्री वानखेडे असे पायी पायी जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी, छत्रपती संभाजीनगर यांचे कार्यालयाकडे रवाना झालो आमचे पाठोपाठ पोलीस उप अधिक्षक श्रीमती पाटील मॅडम, सापळा पथक व पंच क्र.2 श्री. सुधीर दाभाडे असे जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी, छत्रपती संभाजीनगर यांचे कार्यालय परिसरामध्ये येऊन दबा धरुन थांबले. मी जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी, छत्रपती संभाजीनगर यांचे कार्यालयात प्रवेश करण्यापुर्वी माझ्या समोरुन श्री चौधरी हे पायी पायी मेनगेटकडे येत असतांना दिसले. त्यावेळी श्री चौधरी हे माझ्याशी बोलत बोलत कार्यालयाचे कम्पाऊडवालच्या मेनगेटकडे पायी पायी चालत होतो त्यावेळी पंच क्र 1 वानखेडे हे सुध्दा माझ्याबरोबर होते. माझी व श्री.चौधरी यांची भेट झाल्यानंतर मी चौधरी याना हिंदी भाषे मध्ये म्हणलो की, देना ये त्यावर चौधरी म्हणले की, देना त्यावेळी लाचेची रक्कम माझ्या उजव्या हाताने पॅन्टच्या उजव्या बाजुच्या पाठीमागील खिशातुन बाहेर काढुन श्री चौधरी यांचे समोर धरली व म्हणलो की, चार हजार है गिन

लो असे म्हणालो असता श्री चौधरी अंकाऊट ऑफीसर यांनी ठिक है असे म्हणुन त्यांचे उजव्या हाताने लाचेची रक्कम स्विकारुन त्यांचे शर्टच्या समोरील डाव्याबाजुच्या खिशात ठेवली. त्यानंतर सापळा पथकास दिसेल अशा रितीनी लाच स्विकारले बाबतचा इशारा केला. ती वेळ 16.20 ची होती त्यावर लागलीच सापळा पथकातील अधिकारी व कर्मचारी पंच क्र.2 असे सदर घटनास्थळी आले.
त्यानंतर सापळा पथकाने श्री चौधरी अंकाऊट ऑफीसर यांना ताब्यात घेतले त्यानंतर पोलीस उप अधिक्षक श्रीमती पाटील मॅडम यांचे सुचनेवरुन पंच क्रमांक 2 श्री सुधीर दाभाडे यांनी आलोसे श्री चौधरी यांचे शर्टच्या समोरील डाव्याबाजुच्या खिशातुन स्विकारलेली लोचची रक्कम 4000/- रुपये हस्तगत केली व त्यांचेकडे असलेला नोटांचे क्रमांक लिहीलेला कागदावरील नोटांचे क्रमांक व आलोसे श्री चौधरी अंकाऊट ऑफीसर यांचे कडुन ताब्यात घेतलेल्या लाचेच्या रक्कमेच्या नोटांचे क्रमांक तपासुन पाहीले असता सदर नोटा सारख्याच असल्याची सापळा पथकाची खात्री झाली. तसे पोलीस उप अधिक्षक श्रीमती पाटील मॅडम यांनी सविस्तर पंचनामे केले आहे.
त्यानंतर श्री चौधरी अंकाऊट ऑफीसर, यांना पोलीस उप अधिक्षक श्रीमती संगीता पाटील यांनी स्वत:चा परिचय देवुन त्यांना त्यांचे संपुर्ण नाव गाव व पत्ता विचारला असता त्यांनी त्यांचे नाव आरोपी लोकसेवक महेश भालचंद्र चौधरी, वय-50 वर्ष, व्यवसाय नौकरी पद- लेखाधिकारी, जिल्हा अधिक्षक कृषी अधिकारी कार्यालय, छत्रपती संभाजीनगर, रा. C/O श्री संतोष सोनी प्लॉट नं 20, शांतीनाथ हाऊस सोसायटी, गादीया विहार छत्रपती संभाजीनगर मुळ रा. "श्रेयस बंगला" विद्या विहार सोसायटी, ए.के.जे.मेहता हायस्कुल रोड नाशिक सांगीतले.
करीता आज दिनांक 27/10/2023 रोजी आरोपी लोकसेवक महेश भालचंद्र चौधरी, वय-50 वर्ष, व्यवसाय नौकरी पद- लेखाधिकारी, जिल्हा अधिक्षक कृषी अधिकारी कार्यालय, छत्रपती संभाजीनगर, रा. C/O श्री संतोष सोनी प्लॉट नं 20, शांतीनाथ हाऊस सोसायटी, गादीया विहार छत्रपती संभाजीनगर मुळ रा. "श्रेयस बंगला" विद्या विहार सोसायटी, ए.के.जे. मेहता हायस्कुल रोड नाशिक यांनी माझ्याकडे मी काम करत असलेल्या ओम इंटरप्रायजेस, जालना या नावाचे बील मंजुर करुन ट्रेझरी येथे दाखल करण्यासाठी पंच साक्षीदारा समक्ष 4000/- रुपये लाचेची मागणी करुन 4000/- रुपये अ.पा लावलेली लाचेची रक्कम शहनुरवाडी चौकाकडुन उस्मानपुरा कडे जाणा-या रोडच्या लगत असलेली जिल्हा अधिक्षक, कृषी अधिकारी कार्यालयाचे कंम्पाऊड वॉलच्या मेनगेटजवळ स्विकारली म्हणुन माझी महेश भालचंद्र चौधरी यांचे विरुध्द कायदेशिर फिर्याद आहे.
माझी वरील फिर्याद माझे सांगणे प्रमाणे संगणकावर मराठीत टंकलीखीत केली असुन ती मला वाचुन दाखवली ती बरोबर व खरी आहे.

समक्ष हि फिर्याद दिली

13. **Action taken: Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at Item No. 2.** (केलेली कारवाई: बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)

(1) **Registered the case and took up the investigation:**
(प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले):

SUSHIL SHIVRAM JUMDE(I (Inspector)) / PI — or (किंवा)

(2) **Directed (Name of I.O.)** (तपास अधिका-याचे नाव):

**Rank** (पद): **No.**(क्र.):

**to take up the Investigation** (ला तपास करण्याचे अधिकार दिले) **or** (किंवा)

(3) **Refused investigation due to** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):

**or** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)

(4) **Transferred to P.S.**
(गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):

**District** (जिल्हा):

**on point of jurisdiction** (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost.** (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)

**R.O.A.C.**(आर. ओ .ए .सी.)

14 **Signature/Thumb impression of the complainant / informant.**
(तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):

15. **Date and time of dispatch to the court**
(न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):

**Signature of Officer in charge. Police Station**
(ठाणे प्रभारी अधिका-याची स्वाक्षरी)

**Name** (नाव): SUSHIL SHIVRAM JU
**Rank**(पद): I (Inspector)
**No.**(सं.): PI

ड्युटी ऑफीसर
पो.स्टे.उस्मानपुरा,छत्रपती संभाजीनगर